**महसुल व वन विभागाच्या मदत व पुनर्वसन प्रभागासाठी विभागीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांना मान्यता देण्यासाठी स्वतंत्र विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१७/ प्र.क्र.२२२/म-७**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : १६ एप्रिल, २०१८**

**वाचाः-**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -मातंस/नस्ती-२०१०/प्र.क्र.३४/३९, दिनांक १८.०६.२०१०
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -सीओएम-१००१/प्र.क्र.१७४/०१/३९, दिनांक २९.१०.२००१
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -सीओएम-१०९८/प्र.क्र.५१/९८/३९, दिनांक १५.०२.२००५
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -मातंस/नस्ती-२०१०/प्र.क्र.३४/३९, दिनांक १८.०६.२०१०
५) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्रमांक- समिती-२०११/प्र.क्र.९४/ल १ सेल, दिनांक २५.०७.२०११

**प्रस्तावना :-**

राज्याचे प्रशासन अधिक गतिमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार शासनामार्फत जनतेस दिल्या जाणा-या सेवा अधिक गतीने व किफायतशीर रित्या देण्यासाठी विविध मंत्रालयीन विभागाच्या व त्यांच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयामध्ये ई-गव्हर्नन्सचा जास्तीत जास्त वापर करण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार महसुल व वन विभागाच्या इ-प्रशासन प्रकल्पासाठी प्रधान सचिव , महसुल व वन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली असून या समितीमध्ये अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) हे सदस्य आहेत. मदत व पुनर्वसन प्रभाग हा महसूल विभागाचा भाग असला तरीही तो स्वतंत्र प्रभाग आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधितांना मदत देण्याबाबत तसेच विविध प्रकल्पातील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही या प्रभागाकडून करण्यात येते. या प्रभागासाठी स्वतंत्र अपर मुख्य सचिव दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत.

त्यामुळे महसूल विभागाअंतर्गत असलेल्या मदत व पुनर्वसन विभागासाठी इ-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी स्वतंत्र प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

महसुल व वन विभागांतर्गत असलेल्या मदत व पुनर्वसन प्रभागातील ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी खालीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्यात येत आहे.

**विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समिती**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (मदत व पुनर्वसन) | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) किंवा किमान उप सचिव दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव (वित्त) किंवा किमान उप सचिव दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव (उद्योग) किंवा किमान उप सचिव दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | युनिक आयडेडिटी ऑथिरिटी ऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी (गरजेनुसार) | सदस्य |
| ६. | आयुक्त (कृषी) किंवा संचालक दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७. | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ८. | राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, मुंबई | सदस्य |
| ९. | संचालक, रिमोट सेन्सिंग सेंटर, नागपूर | सदस्य |
| १०. | वित्तिय सल्लगार तथा सहसचिव, मदत व पुनर्वसन | सदस्य |
| ११. | संबंधित सह / उप सचिव (मदत व पुनर्वसन ) | सदस्य सचिव |

**२. विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहीलः-**

१) मदत व पुनर्वसन विभागाअंतर्गत राबवावयाच्या रू. ०५.०० कोटी पर्यंतच्या खर्चाच्या ई-गव्हर्नन्स प्रकल्पास मान्यता देणे.

२) प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना एखाद्या बाबतीत प्रकल्प अंमलबजावणी समितीमधील सदस्यांमध्ये एकमत न झाल्यास त्यासंदर्भातील प्रस्ताव निर्णयासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीकडे पाठविणे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, दि. १७ एप्रिल,२०१५ च्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उप विभाग ३, अनुक्रमांक ४ च्या परिच्छेद क्र. २७ (२) नुसार ई-गव्हर्नन्स प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मदत व पुनर्वसन प्रभागास राहतील प्रकल्प अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वित्त, नियोजन किंवा माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

४. वर नमूद केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक विभागाच्या संगणकीकरणाच्या/ प्रकल्पाच्या कार्यक्रमानुसार व आवश्यकतेनुसार घेण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४१६११४२०८४९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.04.16 11:42:53 +05'30'

**( सुभाष उमराणीकर )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव

२. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

३. अपर मुख्य सचिव (उद्योग) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

४. प्रधान सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

५. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

७. उप महासंचालक, युनिक आयडेंटिटी ऑथॉरिटी ऑफ इंडिया, पश्चिम क्षेत्र, मुंबई

८. राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र , मुंबई

९. संचालक,रिमोट सेन्सिंग सेंटर, नागपूर

१०.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर

११.महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४.सर्व विभागीय आयुक्त
१५.सर्व जिल्हाधिकारी
१६.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१७. वित्तिय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१८. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव
१९.मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव
२०.मदत व पुनर्वसन प्रभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी
२१.अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक
२२.निवड नस्ती म-७ कार्यासन